# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र.०२१७-२७४४७७१/ ७२/ ७३/७४ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००

संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in, ई-मेल: affiliation@sus.ac.in

**[ शैक्षणिक, संशोधन आणि विकास (संलग्नता विभाग) विस्तारीत क्रमांक : १२२ ]**




वाचा : विद्यापीठाचे परिपत्रक क्र.पुअहोसोविसो/संलग्नता/२०२२/९०६४, दिनांक २३/११/२०२३

## परिपत्रक

संदर्भीय परिपत्रकाच्या अनुषंगाने सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य/ संचालक यांना मा. राज्यपाल तथा कुलपती यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या JBVC च्या बैठकीतील मुद्दयांच्या अनुरोधाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ९७ (५) (क) मधील तरतूदीनुसार संलग्नित महाविद्यालयाने त्यांचा प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठीचा सर्वसमावेशक विकास आराखडा (IDP - Institutional Development Plan) तयार करुन तो महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावा व त्याबाबतची माहिती विद्यापीठास दिनांक ३०/११/२०२२ पर्यंत सादर करावी, असे कळविण्यात आले होते. तथापि, कांही महाविद्यालयांनी (IDP - Institutional Development Plan) तयार करुन त्याची माहिती विद्यापीठास सादर केलेली नसल्याचे विद्यापीठ प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे.

सदर प्रकरणी मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांनी नवीन शैक्षणिक धोरण २०२०, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ व डॉ. नरेंद्र जाधव समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने दि. ०४/०२/२०२३ रोजी विद्यापीठात मार्गदर्शन केलेले आहे. त्यावेळी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांना ॲकॅडमिक बँक क्रेडिट (ABC) रजिस्ट्रेशन करणे अनिवार्य असल्याचे व महाविद्यालयाने प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठीचा सर्वसमावेशक विकास आराखडा (IDP - Institutional Development Plan) तयार करणे आवश्यक असल्याचे सूचित केले आहे.

यास्तव आपणांस पुन:श्च कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ९७ (५) (क) मधील तरतूदीनूसार ज्या महाविद्यालयांनी त्यांचा प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठीचा सर्वसमावेशक विकास आराखडा (IDP - Institutional Development Plan) विद्यापीठास अद्यापपर्यंत सादर केलेला नाही, त्या महाविद्यालयांनी दिनांक २९/०४/२०२३ पर्यंत सादर करावा. तसेच संलग्नित महाविद्यालयांनी ॲकॅडमिक बँक क्रेडिट (ABC) रजिस्ट्रेशन करणे आवश्यक असल्याने त्यानुसार कार्यवाही करावी.

10/4/23

( योगिनी घारे)
कुलसचिव

जा.क्र. : पुअहोसोविसो/संलग्नता/परिपत्रक/ २०२३ / 2352
दिनांक : 11 APR 2023

प्रति,
**मा. प्राचार्य/ संचालक,**
सर्व संलग्नित महाविद्यालये,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर.